## ३रे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कऱ्हाड, जि. सातारा यांचे न्यायालयात.

(श्री. किरण रा. खोंद्रे यांचे समोर)

**विशेष दिवाणी दावा क्र.९/२०१८.**

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. शाबीरा दि. नायकवडी, वगैरे. | **वादी.** |
| विरुध्द | | |
| १. | श्रीमती शहीदा दि. मुजावर, वगैरे. | **प्रतिवादी.** |

### प्रतिवादी क्र.०१ तर्फे प्रतिदावा दाखल करणेस परवानगी मिळणेच्या (नि.क्र.८२) अर्जावरील आदेश.

**(०१)** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.०१ यांनी वादीविरुध्द प्रतिदावा दाखल करणेस परवानगी मिळावी या करिता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र.०१ चे अर्जाद्वारे कथन असे आहे की, ते प्रतिदावा दाखल करत आहेत तर त्यांना परवानगी मिळावी. प्रतिवादी क्र.०१ चे असे कथन आहे की, ते मुळ दाव्याकामी हजर झाले आहेत व त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.०१ यांना कायद्याने येणारा हिस्सा व हक्क मागणेचा असल्या कारणाने व न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे, प्रतिवादी क्र.०१ यांनी प्रस्तुतचा नि.८२ चा अर्ज दाखल केला आहे.

**(०२)** मुळ वादी यांनी नि.८२ अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करून या अर्जास तीव्र हरकत घेऊन प्रतिवादी क्र.०१ यांचा नि.८२ हा अर्ज व त्यामधील कथने नाकारली असून, ती त्यांना मान्य व कबुल नाहीत. वादी यांचे असे म्हणणे आहे की, वादींनी सदरचा दावा दाखल करुन ०९ वर्षे झालेली आहेत आणि इतक्या प्रदिर्घ कालावधीनंतर प्रतिदावा दाखल करता येत नाही, सदरचा मुळ दाव्यास मुदतीची बाधा येत आहे. तसेच, दाव्यात दाखल बक्षीसपत्र हे सन २०१३ सालातील असल्यामुळे, त्यास देखील मुदतीची बाधा येत आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचा नि.८२ हा अर्ज

मुळातच कायद्यातील तरतुदींचे अनुषंगाने  नसून, अर्ज रद्द होणेस पात्र आहे. सबब, प्रतिवादी क्र.०१ यांचा नि.८२ हा अर्ज नामंजूर करावा आणि प्रतिवादी हे दाव्याचे कामकाज चालवणेस जाणूनबूजून विलंब करत असल्यामुळे, त्यांना वीस हजार रुपये दंड करावा, अशी विनंती वादीनी केली आहे.

(०३) दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

(०४) कबुल तथ्यानुसार मुळ वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीपत्र पूर्ण करुन देणेकरीता, वैकल्पिकरित्या रक्कम परत मिळणे करिता आणी निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. मुळ वादींचे दाव्यात असे कथन आहे की, दावा मिळकती या मुळच्या वादी व प्रतिवादी क्र.०७ व ०८ यांचे वडील बाबालाल ताहेर मुजावर यांच्या वडीलार्जित मालकी वहीवाटीच्या मिळकती होत्या. सदरील बाबालाल हे दिनांक ०८/०४/२००० रोजी मरण पावले असुन त्यांना पत्नी खुदीजाबी, मुलगा रहिमतुल्ला आणी मुली शाबीरा (वादी) लैला आणी हसीना असे वारस आहेत. वादीचा भाऊ रहिमतुल्ला याचे कौटुंबिक व पोटगीकामी वादी यांचे कडुन वेळोवेळी एकुण ४,७६,३००/- इतकी रक्कम उसनवार घेतली होती. सदरची रक्कम परतफेड करणे त्यांना शक्य नव्हते म्हणुन दावा मिळकतीतील त्याचा हिस्सा वादींना खरेदी देणेचे मान्य व कबुल केले होते. परंतु ते अचानक दिनांक २५/०९/२०१३ रोजी मरण पावले. असे असले तरी मयत रहिमतुल्ला याचा दावा मिळकतीतील ‘अ’ हा हिस्सा वादी व तिचे पती वहिवाटत होते. तसेच आई खुदीजाबी यांनी त्यांचा हिस्सा ‘ब’ दिनांक १२/१२/२०१३ रोजीचया बक्षीसपत्राने वादींना दिला आहे. तसेच प्रतिवादी

क्र.०७ यांनी देखील त्यांचा हिस्सा हिब्बानाम्याने वादींना दिला आहे. सबब वादींनी हा दावा दाखल केला आहे.

**(०५)** कबुल तथ्यानुसार यातील प्रतिवादी क्र.०१ ते ०४ यांनी दिनांक १५/०३/२०१८ रोजी निशाणी ४३ येथे त्यांची कैफियत दाखल करुन वादींचा दावा सुस्पष्टरित्या आणी पुर्णत: नाकारला आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचा निशाणी ८२ (दिनांक १८/०२/२०२६ रोजी दाखल) वरील अर्ज पाहिला असता त्यात केवळ '**प्रतिवादी यांना दावा मिळकतीत कायद्याने येणारा हिस्सा व हक्क मागणेचा असलेने प्रतिदावा दाखल करणे गरजेचे पडले आहे**' असे मोघमपणे नमुद केले आहे. यास्तव प्रस्तुत प्रतिवादींनी दाखल केलेली प्रस्तावित प्रतिदाव्याची प्रत पाहिली असता, त्यामध्ये अंतिम विनंतीमध्ये केवळ '**बक्षिसपत्र आणी हिब्बानामा याबाबत उद्घोषणेची**' विनंती केलेचे दिसुन येते. सबब प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज हा प्रस्तावित प्रतिदाव्याशी सुसंगत नाही असे स्पष्टपणे दिसुन येते आहे.

**(०६)** कबुल तथ्यानुसार प्रस्तुत प्रतिवादींनी दिनांक १५/०३/२०१८ रोजी निशाणी ४३ येथे त्यांची कैफियत दाखल केली असुन त्यात वादींचा दावा सुस्पष्टरित्या आणी पुर्णत: नाकारला आहे आणी वादींकडुन नुकसान भरपाईची मागणी केली आहे. असे असले तरी प्रस्तुत प्रतिवादींनी त्यांची कैफियत दाखल केली तेंव्हाच त्यांना प्रतिदावा दाखल करणेस काय अडचण होती याचा पुसटसा उल्लेख, प्रतिवादींच्या अर्जात नाही ही देखील वस्तुस्थीती आहे, की जी दुर्लक्षित करता येण्याजोगी नाही. प्रतिवादींना कैफियत दाखल करुन तब्बल ०७ ते ०८ वर्षाचा कालावधी उलटला आहे. सदर प्रदीर्घ अशा मुदतीत प्रस्तुत प्रतिवादींनी, प्रतिदावा का दाखल केला नाही?, किंवा तसे करण्यापासुन त्यांना कोणी परावृत्त केले, याचे कसलेही स्पष्टीकरण अर्जात

नाही. कबुल तथ्यानुसार निशाणी ८२ वरील अर्ज हा केवळ ०४ ओळींचा आणी तेही प्रतिवादींचे वकीलांच्या सहीचा आहे. त्यावर ना प्रतिवादी क्र.०१ ची सही आहे, ना सदर अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिवादी क्र.०१ चे शपथपत्र दाखल आहे. या सर्व तथ्यांचा, अक्षम्य अशा विलंबाचा, सुस्पष्ट आणी न्यायसंमत अशी कारणे नमुद नाहीत, याचा एकत्रीत विचार करता, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र नाही या अनुमानास मी आलो आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

(०१) निशाणी ८२ वरील अर्ज नामंजुर करणेत आला.

(०२) अर्जाचा खर्च प्रस्तुत प्रतिवादींवर राहील.

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.07.16 17:05:33 +0530

कऱ्हाड. ( किरण खोंद्रे )

दि.१६/०७/२०२६ ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कऱ्हाड.